NO-25

UGC
APPROVED

Theme

Contemporary History and Research Methodology



Savitribai College of Arts
ID. No.
PU/AN/A/
58/1999
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

Index

1	**The Importance of Cultural Heritage in India** **Dr. Khairdi I.M.**	11
2	**The Cultivators Whipcord: An Indicator of the Dual Economic Drain of the Farmers** **Dr. Ajaykumar Pralhad Lokhande**	15
3	**Hundred years of champaran Satyagraha** **Dr. Raghunath D. Shelke**	19
4	**HISTORY OF NATIONAL LIBRARY CALCUTTA** **Mr. Rishi S. Gajbhiye**	23
5	**The Art of Ancient Ship** **Dr. Javed Tamboli, Dr. Ashok mane**	27
6	**A STUDY OF FEMINIST ACTIVISM IN INDEPENDENT INDIA** **Anisha Srivastava**	29
7	**The politics of 'conservation' : A study of environmental history during colonial times** **Ms. Nishtha Srivastava**	32
8	**सोलापूर शहरातील मध्ययुगीन कालखंडातील मुस्लिम धार्मिक स्थळे** डॉ. अमिता सोपान जावळे	35
9	**कर्मवीर दादासाहेब गायकवाड व सामाजिक विषमतेविरुध्द व्यक्तिगत चळवळी** **Dr. Waghmare Vishnu Babruvan**	41
10	**मध्ययुगीन धार्मिक इतिहासातील भक्ती चळवळीचे समकालीन महत्व** प्रा.डॉ.क्षीरसागर सुनिल भाऊसाहेब	43
11	**सम्राट अशोकाचा 'धम्म'** प्रा.डॉ. सावंत जयपाल चंद्रकांत	46
12	**सावंतवाडी संस्थानातील प्रजा परिषद व संस्थानचे विलिनीकरण** प्रा.डॉ.एस.पी. शिंदे	49
13	**छत्रपती संभाजी महाराजकालीन मराठे - पोर्तुगीज संघर्ष** प्रा.डॉ.राजेंद्र गायकवाड	52
14	**समकालीन इटालियन प्रवासवर्णने : मध्ययुगीन महाराष्ट्राच्या इतिहासाचे प्राथमिक संदर्भ साधने** Dr. PANKAJKUMAR SHANKAR PREMSAGAR	56
15	**श्रीमंत मालोजीराजांनी कोरडवाहू आणि भूमिहीन शेतकऱ्यांसाठी केलेले कार्य** प्रा.डॉ.एस.एम.गावडे	60
16	**मध्ययुगीन मुस्लीम इतिहासलेखनातील समकालीन इतिहासकारांचा वस्तूनिष्ठ दृष्टीकोन :- एक मिमांसा** श्री.मराळ ए.एम.	62
17	**समाजसुधारणा व प्रबोधन चळवळीचे समकालीन महत्त्व: एक तात्त्विक चिंतन** श्री.नरवाडे बालाजी मारोतराव	69
18	**महाड तालुक्यात बौध्दकालीन पाले लेणीचा अभ्यास** डॉ.भानुदास धोंडिबा शिंदे	72
19	**इरळी (जि. सांगली) येथील प्राचीन मंदिर व सुरसुंदरी** श्री. सचिन पांडूरंग शिंदे	75
20	**कासेगाव परगण्यातील मंदिर स्थापत्यकला: एक अभ्यास** प्रा. साळुंखे यु. ए.	78
21	**स्त्रीवादी, लिंगभाववादी इतिहासलेखन** डॉ. तुकाराम नारायण शिंदे	80
22	**FEMINISM : A LITERARY** **Dr. Anupama Prakash**	83

ID. No. PU/AN/A/ 58/1999

PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

23	कंबीर के विचारों की प्रासंगिगता प्रा.डॉ.नवनाथ गाड़ेकर	85
24	अहमदनगर जिल्ह्याच्या दक्षिण भागातील सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि शैक्षणिक स्थितीचा अभ्यास प्रा.डॉ. रघुराज मुगुटराव कुरुमकर	87
25	डॉ. नारायणराव दामोदर सावरकर - जीवन व कार्य : एक अभ्यास (१८८८ - १९४९) प्रा. डॉ. मनिषा माणिकराव जगदाळे (कुरुमकर)	90
26	महानुभाव संप्रदायाची वर्णजातिव्यवस्था विरोधी भूमिका दिगंबर शिवाजी वाघमारे	93
27	महात्मा फुलेंचे स्त्रि-पुरुष समानतेविषयक विचार व कार्य Shri.Narayan Dattatray Bansode	95
28	क्रांतीसिंह नाना पाटील यांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान प्रा.डॉ.ए.एस.टिके	99
29	राष्ट्रीय ग्रंथ : भारतीय संविधान - आंबेडकरी विचारांचा सर्वोच्च मानबिंदू प्रा. शशिकांत रघुनाथ वाघमारे	101
30	शेतकरी चळवळ व गोपीनाथराव मुंडे प्रा. डॉ. शेप बाबासाहेब केशवराव	105
31	पूर्वखानदेश जिल्ह्यात देवकीनंदन नारायण यांचे खादी प्रचार-प्रसार कार्यातील योगदान प्रा.डॉ.दिनेश रामदास महाजन	108
32	डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार प्रा.टी.एच.आघाव	110
33	सोलापूर जिल्ह्यातील तालुकानिहाय मका पीक विविधतेचा समकालीन अभ्यास प्रा. डॉ. लोंढे सी. बी.	113
34	आधुनिक भारताच्या जलनीतीचे प्रवर्तक डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रा. कृष्णा कांबळे	115
35	पर्यटन आणि इतिहास VIJAYA H. GAIKWAD	117
36	स्त्रीवादी दृष्टिकोन : एक अभ्यास प्रा.डॉ.हणमंत महादेव लोंढे	119
37	समाज सुधारकांचे स्त्री सुधारणेचे समकालीन महत्व डॉ. मोरे डी.ए.	121
38	विश्व भाषाओं में हिंदी का महत्व प्रा.अनिल जाधव	123
39	कान्होजी जेधे यांचे स्वराज्यातील योगदान डॉ. संतोषकुमार धनसिंग कांबळे	125
40	डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि चळवळ Dr. Prof. Kamble H. K	127
41	२० व्या शतकातील कामगार चळवळीची पार्श्वभूमी प्रा.डॉ. सुनिल शिवमुर्ती रजपूत	129
42	आटपाडी तालुक्यात कृषी पीक पध्दतीमध्ये झालेले बदल सौ. देशमुख सुजाता सचिन	131
43	सांस्कृतिक पर्यटन मीमांसा प्रा.भास्कर टेकाळे	134
44	छ.शाहू महाराज व फत्तेसिंह भोसले संबंध - एक अभ्यास Prof.Dr. Ghatule S. S.	136
45	राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य Prof. Sarla Bramhdeo Chavan	138
46	अहमदनगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट पक्षाच्या प्रचार व प्रसारामध्ये कॉम्रेड डी.बी.कुलकर्णी यांचे योगदान प्रा. विधाटे गणेश शंकर	142
47	महिला कामगार आणि मानवाधिकार प्रा.सौ. कापशीकर घनश्री रामचंद्र	147

Savitribai College of Arts ★ Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar ★ ID. No. PU/AN/A/ 58/1999

PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

Historicity International Research Journal SPECIAL ISSUE ISSN : 2393-8900
Impact Factor : 1.9152 (UIF)

Contemporary History and Research Methodology

अहमदनगर जिल्ह्याच्या दक्षिण भागातील सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि शैक्षणिक स्थितीचा अभ्यास (१९९०-२०००)

प्रा.डॉ. रघुराज मुगुटराव कुरुमकर
सावित्रीबाई कला महाविद्यालय,
पिंपळगाव पिसा, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर.
मोबा. ९८६०३२८५१८.

प्रस्तावना -

अहमदनगर हा महाराष्ट्रातील इतिहासाचा उज्ज्वल वारसा लाभलेला जिल्हा आहे. महाराष्ट्रात अहमदनगर जिल्हयाला इतिहासात एक वेगळे स्थान निर्माण झाले आहे. महाराष्ट्र राज्याच्या नकाशावर अहमदनगर जिल्हयाला खऱ्या अर्थाने मानाचे स्थान मिळून दिले असेल तर ते सहकार चळवळीने जिल्हयाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीची सुरुवात प्राचीन काळात अभ्यासवयास मिळते. जिल्हयाचे भौगोलिक क्षेत्रफळ पाहता १७,०४८ चौ.कि.मी. इतके आहे. अशा या भौगोलिक विस्ताराने मोठया असणाऱ्या जिल्हयात अनेक ऐतिहासिक व धार्मिक वास्तू आहेत. यामध्ये प्रामुख्याने भुईकोट किल्ला, चाँदबीबीचा महाल, खडर्याचा किल्ला, बहादुरगड, भगवानगड, अवतार मेहेरबाबा, संत शेख महंमद बाबा, गोदड महाराज, कानिफनाथ, चौंडी आहिल्याबाई इ. ऐतिहासिक व धार्मिक वास्तूंनी हा जिल्हा संपन्न झालेला दिसून येतो.

ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभूमी असलेल्या जिल्हयाच्या क्षेत्रफळाचा विचार करता उत्तर नगर व दक्षिण नगर असे दोन भाग पाडलेले आहेत. अहमदनगर जिल्हयातच सहकार चळवळीला प्रारंभ झालेला दिसून येतो. सहकार चळवळीतून मोठया प्रमाणावर राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक उलाढाल झाल्याचे दिसून येते. म्हणून संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष अहमदनगर जिल्हयावर असल्याचे दिसून येते. म्हणून जिल्हयाच्या पाडलेल्या दोन भागापैकी दक्षिण नगर भागातील असणारे नगर, पारनेर, पाथर्डी, श्रीगोंदा, कर्जत, जामखेड या तालुक्यांच्या गेल्या दहा वर्षातील सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक स्थितीचा अभ्यास केला आहे.

उपेक्षीत आणि दुर्लक्षित राहिलेल्या जिल्हयाचे दक्षिण भागाचे योगदान प्रकाशात आणावे या हेतूने व इतिहास लेखनाची स्थानिक इतिहास किंवा प्रादेशिक इतिहास एक शाखा असल्याने संशोधक संशोधनासाठी या विषयाकडे वळला आहे. परंतु या दक्षिण भागातील कार्य प्रस्तुत विषयाच्या संशोधनाचा निरपेक्ष मानस असून इतिहासाचा एक अभ्यासक व संशोधक या नात्याने १९९० ते २००० या कालखंडातील अभ्यास करण्यात आला आहे.

महाराष्ट्राचा विकास हा सहकार क्षेत्रावर आधारलेला आपणास दिसून येतो. सहकार क्षेत्रात महाराष्ट्राचे फार मोठे योगदान आहे. महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्हयाला इतिहासात एक वेगळे स्थान निर्माण झाले आहे. आशिया खंडात सहकारी कारखानदारीचा पाया अहमदनगर जिल्हयात घातला गेला. पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांनी १९४९ मध्ये सहकारी साखर कारखाना उभारुन सहकार चळवळ यशस्वी करुन दाखविली. ङ्गविना सहकार नाही उध्दारङ्घ या तत्त्वाचा अवलंब करण्यात आला आणि त्यात यश मिळविले. सहकाराची खरी मुहूर्तमेढ रोवण्यात आली. १९९०-२००० या काळात पतसंस्था, सेवा सहकारी संस्था, साखर कारखाने, दूध उत्पादक संस्था तालुका देखरेख संघ, तालुका खरेदी विक्री संघ, या सहकार तत्त्वावर उभारल्या असल्याचे आपणास दिसून येते. या संस्थाच्या माध्यमातून विकास साधण्याचा प्रयत्न केल्याचे आढळून येते. उत्तर नगर जिल्हयात सहकाराची चळवळ मोठया प्रमाणावर फोफावली त्यामुळे उत्तर नगरचा विकास दक्षिणेच्या मानाने फार मोठया प्रमाणावर झाला. कारण दक्षिणेतील काही सहकारी संस्थांवरील वर्चस्व हे एकाच व्यक्तीच्या हातात असल्याचे दिसून येते. ती सतत आपल्याच हाती राहावी अशी त्यांची वृत्ती दिसून येते त्याचा परिणाम समाज मानसावर होतो. काही प्रमाणात विकास होतो, परंतु तो संथ गतीने वेगवेगळया पक्षाचे, विचारांचे प्रतिनिधित्त्व निर्माण झाल्याचे दिसून येते. त्यामुळे विकासाला सर्वांगीण महत्त्व नसल्याचे आपणास आढळते. मोठया प्रमाणावर आपले वर्चस्व निर्माण करुन सहकारी साखर कारखाने हे आपल्या ताब्यात कसे राहतील हे ती व्यक्ती पाहते. थोडक्यात, दक्षिणेकडील तालुक्याची एककेंद्री सत्ता असल्याने मोठा विकास होऊ शकला नाही. अहमदनगर जिल्हयाने सहकार चळवळीसाठी अनेक सहकारमहर्षी देऊन सहकार चळवळीस अमूल्य असा वारसा निर्माण केला. सहकार चळवळीचे मोठे योगदान अहमदनगर जिल्हयाचेच, त्यामुळे मोठया प्रमाणावर आर्थिक उलाढाल व शैक्षणिक, सामाजिक, राजकीय विकास यामुळे सर्वांचे लक्ष अहमदनगर जिल्हयाकडे वेधले जाते.

संशोधनाची उद्दिष्टे -

१. अहमदनगर जिल्हयातील ऐतिहासिक, भौगोलिक, धार्मिक पार्श्वभूमीचा आढावा घेणे.
२. जिल्हयाच्या दक्षिण भागातील इ.स. १९९० ते २००० या कालखंडातील सामाजिक, आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.
३. दक्षिण भागातील शैक्षणिक, सांस्कृतिक कार्यांचा आढावा घेणे.
४. शेतकरी, कामगार, मागास व उपेक्षीत यांच्या उन्नतीसाठी सहकार क्षेत्राने घडवून आणलेला बदल अभ्यासणे.

संशोधनाची गृहितके -

१. अहमदनगर जिल्हयाला भौगोलिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे.
२. दक्षिण भागात शेतकरी चळवळ झालेली आहे.
३. अनेक शैक्षणिक व सामाजिक संस्थातून विकास घडून आलेला आहे.
४. शेतकरी, कामगार, स्त्रिया, मागास व उपेक्षीत यांना विविध संस्था महत्त्वपूर्ण व दिशादर्शक आहेत.

PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

Savitribai College of Arts ID. No. PU/AN/A/58/1999 Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

Historicity International Research Journal *SPECIAL ISSUE* ISSN : 2393-8900
Impact Factor [illegible]

Contemporary History and Research Methodology

अहमदनगर जिल्ह्याच्या दक्षिण भागातील राजकीय, सामाजिक स्थिती

[illegible] नगर जिल्ह्याचा विचार केला [illegible] कालखंडात [illegible] पाहिले [illegible] दक्षिणेमध्ये [illegible] राजकीय [illegible] पक्षाने [illegible] दिसून येते [illegible] जी विकास [illegible] दक्षिण [illegible] दिसून येत नाही. [illegible] त्यांना [illegible] आपल्या [illegible] दिसून येत. परंतु हे [illegible] राजकीय [illegible] नंतर [illegible] नाही. त्यामुळे राजकीय [illegible] दक्षिण भागाचा विकास काही प्रमाणातच झाला. राजकीय [illegible] निर्माण होऊ शकला नाही. यामुळे विकासाला मोठ्या प्रमाणावर चालना मिळू शकली नाही. नगर [illegible] नगर जिल्ह्यावर [illegible] या कालखंडात असल्याने आढळून येते. [illegible] माध्यमातून आपले वर्चस्व सिध्द करणे, हेच [illegible] दक्षिण भागाच्या [illegible] दिसून येते. [illegible] विकासाला काही प्रमाणात [illegible] असल्याचेही जाणवते.

सामाजिक कार्य व त्यातून दक्षिण भागातील तालुक्याचा उत्कर्ष [illegible] माडला आहे. जिल्ह्यातील शेतकरी चळवळ सहभागी नेते मंडळी व त्यातून पुढे निर्माण झालेली सहकार चळवळ व पाणीप्रश्न याचाही आढावा घेण्यात घेतला. नगर दक्षिणेतील जलदायिनी त्यांच्या माध्यमातून साधलेले विकास कार्य, धोंड, कुकडी प्रकल्प, [illegible] जलसंत, सिना प्रकल्प, तावोरी [illegible] असे विविध पाणी प्रश्न व चळवळ यांचा पाचवरचा अभ्यास केला आहे.

सहकारी साखर कारखाने स्थापन केले. सहकारी दुध उत्पादक संघाची स्थापना केली व जोडधंदा दुग्धव्यवसाय सुरु करण्याचे काम केले व त्यातून सामाजिक विकासाला चालना मिळाली. परंतु नगर मुख्य जिल्ह्यात शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक प्रगती होऊनही अहमदनगर जिल्ह्यात आणि जिल्ह्याच्या दक्षिण भागात सामाजिक अन्याय अत्याचाराच्या घटनाही १९९० ते २००० या कालावधीत घडून आल्याच्या दिसतात. धवडी, ता. कर्जत येथील आमदार विठ्ठलराव भैलुमे (धवडी) यांच्यावर सवर्णांनी केलेला हल्ला [illegible] बैल पोळ्याच्या सणाच्या वेळी धवडी येथे दंगल घडून आली होती. त्यामध्ये आमदार विठ्ठलराव भैलुमे यांना मारहाण करण्यात आली होती. दक्षिण नगर जिल्ह्यात मागासवर्गीयांवर अत्याचार झाल्याचे दिसून येते. अकोले तालुक्याचे आमदार मधुकर पिचड हे पाच वेळा निवडून आले. आदिवासी, मागास, उपेक्षितांवर होत असलेल्या अन्याय-अत्याचाराच्याविरोधात त्यांनी मोर्चे, आंदोलने केली आहेत. जात म्हणजे जी कधीही जात नाही ती जात समाजात अजूनही जात पात मानली जाते. जोपर्यंत समाजाची मानसिकता जातिविरोधात तयार होत नाही तोपर्यंत जातीची दरी वाढत जाणार आणि याच गोष्टींचा फायदा नेते घेत असतात. यामुळे पुढारी वर्गाचा फायदा होतो. थोडक्यात, सामाजिक बदल होणे गरजेचे आहे. एक देव, एक राष्ट्र, एक धर्म, एक जात, निर्माण होणे गरजेचे आहे. माणूस ही जात आणि माणुसकी हा धर्म एवढ्याच दोन गोष्टींचा समाजाने विचार केला पाहिजे.

अहमदनगर जिल्ह्याच्या दक्षिण भागातील आर्थिक स्थिती -

दक्षिणनगर मधील उद्योगधंदे त्यांचा विकास त्यामाध्यमातून झालेला भौतिक बदल, शेतीव्यवसाय, जमिनीचा वापर, विविध साधनांचे ओलिताखालील क्षेत्र, पावसाच्या पाण्यावर आधारीत आहे. यातून उत्पादीत प्रमुख पिके, पिकपध्दती, पिकाखालील क्षेत्र ऊस, कापूस, इतर पिके, फळबाग घेतली जातात. ऊस उत्पादनावर आधारीत साखर उद्योग हा प्रमुख व्यवसाय आहे. शेती व्यवसायाचा आढावा घेतला आहे. नगर दक्षिण भागाचा आर्थिक विकासाबरोबर शैक्षणिक विकास झाल्याचे दिसते.

आर्थिक स्थितीमध्ये तुलना केली असता नगर उत्तरची आर्थिक स्थिती अतिशय चांगली आहे. पाण्याची उपलब्धता असल्याने बरीच शेतजमीन पाण्याखाली आली आहे. त्यामुळे उसाचे क्षेत्र जास्त असल्याने कारखानदारीचा विकास मोठ्या प्रमाणावर झाल्याचे दिसून येते. याउलट दक्षिण नगरचीस्थिती पाहता कुकडी कालव्याच्या आसपासची गावे व शेतजमीन ओलिताखाली आली. १९९० ते २००० मध्ये दक्षिण नगरमध्ये श्रीगोंदा, पारनेर, कर्जत, पाथर्डी येथे साखर कारखाने येते. २००० नंतर कुकडी, साईकृपा एक व दोन अशा कारखान्यांची निर्मिती झाली. परंतु जगदंबा व पारनेर सहकारी साखर कारखाना व्यवस्थापनाच्या अभावामुळे तसेच [illegible] प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्यामुळे तसेच राजकीय पुढाऱ्यांच्या ठेकेदारीमुळे अवसायनात जाण्याची वेळ आली. त्यामुळे हे कारखाने भाडेतत्त्वावर चालविण्याची वेळ आली आहे.

२००० नंतर पारनेर तालुक्याच्या सुपा-वाघुंडे नगर-पुणे मार्ग या परिसरात नुकतेच एम.आय.डी.सी. सुरु झाली आहे. त्यामुळे स्थानिक तरुणांना रोजगाराची संधी प्राप्त झाली आहे. परंतु राजकीय उदासीनतेच्या अभावी विकासाची गती मंद होत चालली आहे. काही प्रमाणातच विकास झाल्याचे दिसून येत आहे. थोडक्यात, राजकीय हेवेदावे, गटबाजी, पक्षपातीपणा सोडल्यास विकासाला चालना मिळाल्याशिवाय राहणार नाही.

अहमदनगर जिल्ह्याच्या दक्षिण भागातील शैक्षणिक स्थिती -

राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक विकासाबरोबर शैक्षणिक विकास झाला पाहिजे या दृष्टीने हसमाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण ही गुरुकिल्ली आहे हे राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, महर्षी विठ्ठलरामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील या सर्व थोर पुरुषांच्या विचारांशी साधर्म्य राखत दक्षिणेतील नेत्यांनी तालुका-जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी साखर कारखाने [illegible] माध्यमातून शैक्षणिक संस्था स्थापन केल्याचे दिसून येते. उत्तर नगर जिल्ह्यात प्रवरा रुरल एज्युकेशन सोसायटीच्या स्थापनेनंतर लोणी, प्रवरा परिसरात बाळासाहेब विखे पाटलांच्या प्रयत्नातून शिक्षणाचे जाळे पसरले आहे. संगमनेर, अकोले, राहुरी, श्रीरामपूर या परिसरातही शिक्षण संस्था उभ्या राहिल्या. रयतशिक्षण संस्थेच्या शाळा कॉलेजही उत्तर नगरमध्ये मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील मुलांच्या शिक्षणाची सोय झाली. त्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत झाली. परंतु १९९० ते २००० पर्यंत दक्षिण नगरमध्ये शैक्षणिक विकास कमी प्रमाणात झाल्याचे आढळून दिसून येते. नागवडे, पाचपुते, शेळके, देशमुख, राजळे, आव्हाड यांनी शिक्षण संस्थांची उभारणी [illegible] परंतु [illegible] त्या [illegible] गती घेता आली नाही. त्यामुळे मागास-उपेक्षित लोकांपर्यंत [illegible] शिक्षण [illegible] शैक्षणिक क्षेत्र प्रगत झाल्याचे दिसून येते.

PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

निष्कर्ष -

१. अहमदनगर जिल्हयाला आणि दक्षिण भागातील तालुक्यांना ऐतिहासिक, धार्मिक वारसा मोठया प्रमाणावर असल्याने त्यांच्यात सामंजस्यता जोपासून समरसता वाढीस लागली.

२. अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागात भौगोलिक व धार्मिक पर्यटन स्थळे आहेत. त्यामुळे तेथील आर्थिक उलाढालीत भर पडली. लोकांना रोजगार मिळाला.

३. अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागात राजकीय चळवळ घडून आली व या चळवळीतून नेत्यांनी राजकीय, सामाजिक कार्यांतून विविध संस्था स्थापन केल्या व यातून ग्रामीण जनतेच्या विकासाला मदत झाल्याचे दिसून येते. यातूनच सहकारी चळवळीचा उदय झाला.

४. दक्षिणेतील नेत्यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीत पक्षाशी एकनिष्ठ राहून वेळप्रसंगी पक्ष बदल करुन समाजविकास साधण्याचा प्रयत्न केला. राजकारणात मोठ-मोठी पदे भूषवूनही राजकीय शिंतोडा उडाला तरीसुध्दा आपले कार्य एकनिष्ठेने केले आहे. थोडक्यात पक्षनिष्ठेपेक्षाही सामाजिक विकासाला प्राधान्य दिले.

५. जिल्हयाच्या दक्षिण भागात शेतकरी चळवळ, पाणीप्रश्न यावर आंदोलन झाले व त्यातून शेतकऱ्यांचे प्रश्न मार्गी लागले. काही जलप्रकल्प उभे राहिले, यातून शेतकऱ्यांचे जीवनमान बदलण्यास मदत झाली. सहकार चळवळीतून सहकारी साखर कारखान्यांची स्थापना झाली. यामुळे आर्थिक स्तर उंचावण्यास काही प्रमाणात मदत झाली.

६. जिल्हयाच्या दक्षिण भागातील नेत्यांचे राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सहकार व शेतीविषयक योगदान निश्चितच मोठे प्रेरणादायी असले तरी समाजाच्या सर्व स्तरापर्यंत त्यांना शक्य न झाल्यामुळे जनसामान्यांचा पूर्णत: विकास झालेला दिसून येत नाही.

७. समाजात शांती आणि क्रांती घडवून आणण्याचे कार्य दक्षिणेतील नेत्यांनी केले आहे. यातूनच सामाजिक बांधिलकी जोपासलेली दिसते.

८. अहमदनगर जिल्हयाच्या दक्षिण भागात उद्योगधंद्यांना कमी प्रमाणात प्रोत्साहन मिळाले. परंतु आर्थिक सुधारणांसाठी आवश्यक अशा सहकारी बँका, सहकारी पतपुरवठा संस्था यांच्या प्रयत्नातून मात्र ग्रामोद्योगाला प्रोत्साहन मिळाले.

९. अहमदनगर जिल्हयातील सहकार चळवळ आणि साखर उद्योग यांच्या माध्यमातून शेतकरी, कामगार, ग्रामीण जनता, मागास, उपेक्षित, वंचित यांच्या उन्नतीसाठी सहकार क्षेत्राने बदल घडवून आणले.व त्यातून सामाजिक बांधिलकी जोपासली.

१०. सहकार चळवळ, शेतकरी चळवळ, पाणीप्रश्न यातून उभे राहिलेले प्रकल्प या माध्यमातून तालुक्यातील ओलिताखाली आलेल्या शेतीव्यवसायाला काही प्रमाणात चालना मिळाली व त्यातून दुग्धव्यवसायासारखे जोडधंदे यशस्वी ठरले. यातूनच शेतकरी आर्थिकदृष्ट्या विकसित झाले.

११. शेतकरी, कामगार, मागास, उपेक्षित, वंचित, स्त्रिया, मजूरवर्ग यांना विविध संस्था महत्त्वपूर्ण व दिशादर्शक ठरल्या आहेत. त्यातून काही प्रमाणात प्रगती होण्यास मदत झाली आहे.

१२. जिल्हयाच्या दक्षिण भागातील शैक्षणिक प्रसार करण्यासाठी पारंपारिक व्यवसाय शिक्षणाला प्राधान्य दिले.

समाजातील काही प्रमुख व्यक्तींनी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व कृषी क्षेत्रात स्वत:चे स्थान निर्माण केलेले दिसते.

संदर्भग्रंथ सूची

१. ''जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, अहमदनगर जिल्हा'', अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९९० ते २०००.
२. कोठेकर शांता, ''इतिहास तंत्र आणि तत्त्वज्ञान'' साईनाथ प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, २००५.
३. जोशी सुरेश, भारदे बाळासाहेब (संपा.) ''अहमदनगर जिल्ह्यातील स्वातंत्र्य संग्राम (१८१८-१८४७)'', अहमदनगर ऐतिहासिक वस्तु संग्रहालय, प्रथमावृत्ती, ऑगष्ट १९९३.
४. देशमुख रामचंद्र नी., ''आपला अहमदनगर जिल्हा'', कल्पना प्रकाशन, नांदेड, सुधारित आवृत्ती, २०११.
५. नेवासकर अशोक, ''श्रीगोंदा तालुक्याची ऐतिहासिक पाहणी'', अहमदनगर, डिसेंबर १९६९.
६. नेवासकर अशोक, ''कर्जत तालुक्याची ऐतिहासिक पाहणी'', अहमदनगर, डिसेंबर १९६९.
७. नेवासकर अशोक, ''जामखेड तालुक्याची ऐतिहासिक पाहणी'', अहमदनगर, डिसेंबर १९६९.
८. म्हस्के सुनिल नाथा, ''नगरगौरव'', रेखा सुनिल म्हस्के (प्रकाशक), राहुरी, प्रथम आवृत्ती, २००९.
९. हजारे अण्णा, ''माझे गांव माझे तीर्थ'', स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी प्रकाशन, राळेगणसिध्दी, तृतीय आवृत्ती, जानेवारी २०११.

इंग्रजी :

१) www.ahmednagar.nic.in/gazettear.

नियतकालिके व वृत्तपत्रे :-

दै. गांवकरी, 'ज्ञानदीप गौरव अंक', अनिरुध्द देवचक्के, (संपा.), नगर आवृत्ती, १९ फेब्रुवारी १९९९.
दै. सकाळ, अनंत दिक्षित, (संपा.), नगर आवृत्ती, दिनांक २४/०८/१९९८.
दै. सकाळ, अनंत दिक्षित, (संपा.), नगर आवृत्ती, दिनांक २२/०४/१९९९.

Savitribai College of Arts ID. No. PU/AN/A/ 58/1999 Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar
PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar